विस्तार पुस्तिका १/२०१३

# राष्ट्रीय कृषि विकास योजना

❖ एकात्मिक पिक व्यवस्थापन तंत्रज्ञान प्रसार प्रकल्प ❖

❖ कृषि विद्यापीठ विकसित बियाण्यांचा बिजोत्पादन कार्यक्रम ❖

# यशोगाथा ....

(सामूहिक पिक प्रात्याक्षिके आणि ग्राम बिजोत्पादन)










डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ

## कृषि विज्ञान केंद्र

किल्ला, ता. रोहा, जि. रायगड

फोन क्र. (०२१९४) २०३१०८

ई मेल - kvk_roha@rediffmail.com

ICAR





# मनोगत ....

महाराष्ट्र शासन तसेच महाराष्ट्र कृषि शिक्षण परिषद, पुणे यांच्या सहकार्याने डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठामार्फत एकात्मिक पिक व्यवस्थापन तंत्रज्ञान प्रसार प्रकल्प आणि विद्यापीठ विकसित बियाण्यांचा बिजोत्पादन कार्यक्रम सन २०११ पासून राबविण्यास सुरुवात झाली. वरिल दोन्ही प्रकल्प रायगड जिल्ह्यात राबविण्याकरिता विद्यापीठाच्या अधिपत्याखालील कृषि विज्ञान केंद्र, किल्ला – रोहा यांची निवड करण्यात आली. या केंद्रा मार्फत २०११ पासून प्रत्येक खरीप व उन्हाळी हंगामात भात व भुईमूग या पिकांची सामूहिक पिक प्रात्याक्षिके तसेच भुईमूग ग्राम बिजोत्पादन कार्यक्रम जिल्ह्यातील रोहा, महाड व पोलादपूर तालुक्यातील १० गावामध्ये राबविण्यात आला. या प्रकल्पांतर्गत ४५ हेक्टर क्षेत्रावर भात व ३० हेक्टर क्षेत्रावर भुईमूग पिकाची विद्यापीठाने विकसित केलेल्या तंत्रज्ञानाची सामूहित प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली. तसेच ग्रामबिजोत्पादन कार्यक्रमांतर्गत २ हेक्टर क्षेत्रावर भुईमूग बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात आला. लाभार्थी शेतकरी व विस्तार कार्यकर्ते यांची क्षमता विकसित करण्यासाठी मनुष्यबळ विकास कार्यक्रमांतर्गत १३ शेतकरी प्रशिक्षण, १ विस्तार कार्यकर्ता प्रशिक्षण, ५ शेतकरी मेळावे व १ शेतकरी सहलीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांचा लाभ १७५६ शेतकऱ्यांनी घेतला.

या योजनांमध्ये सामूहिक शेतीला चालना देणे यावर प्रामुख्याने भर देण्यात आला. रोहा कृषि विज्ञान केंद्राने नाबार्ड अंतर्गत स्थापन केलेल्या शेतकरी मंडळांनी सामूहिक पिक प्रात्यक्षिकांमध्ये सहभागी होवून समूह शेतीचा जिल्ह्यातील शेतकऱ्यांसमोर आदर्श ठेवला आहे. रायगड जिल्ह्यात खरीप हंगामात भुईमूग पिकाची यशस्वी लागवड करुन दाखविल्याबद्दल पडवी गावातील शेतकऱ्यांचे त्याचप्रमाणे भुईमूग ग्रामबिजोत्पादन कार्यक्रम राबवून विद्यापीठाच्या कोकण ट्रॉम्बे टपोरा जातीचे चांगले उत्पादन घेतल्याबद्दल वरंध गावातील शेतकऱ्यांचे विशेष अभिनंदन.

या योजनेअंतर्गत भात व भुईमूग पिकाच्या सामूहिक प्रात्यक्षिकांमधील उत्पन्न अपेक्षित उत्पन्नापेक्षा जास्त होते. सहभागी शेतकऱ्यांच्या उत्पादनात झालेली वाढ, ज्ञानात व मानसिकतेत झालेला बदल शेतकरी गट प्रमुखांच्या तसेच काही वैयक्तिक शेतकऱ्यांच्या प्रतिक्रियांमधून दिसून येतो.

या प्रकल्पांतर्गत कृषि विज्ञान केंद्र, रोहा मार्फत रायगड जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या सामूहिक शेतीच्या यशोगाथा वाचकांना उपलब्ध करुन देताना मला विशेष आनंद आणि समाधानही वाटत आहे. राष्ट्रीय कृषि विकास योजना रायगड जिल्ह्यात राबविण्यासाठी कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. मनोज तलाठी आणि त्यांचे सर्व सहकारी यांनी घेतलेल्या परिश्रमांचे मी कौतुक करतो.

कि. ए. लवांडे

(किसन लवांडे)
कुलगुरु
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली, जि. रत्नागिरी

## राष्ट्रीय कृषि विकास योजना - एकात्मिक पिक व्यवस्थापन तंत्रज्ञान प्रसार प्रकल्प

# सामूहिक भात पिक प्रात्यक्षिक




गाव - खांब, ता. रोहा

वर्ष - २०११-१२

हंगाम - उन्हाळी

पिक - भात, जात - कर्जत - ७

सहभागी शेतकरी - ३१



आम्ही खांब, ता. रोहा गावातील शेतकरी दरवर्षी भात पिकाचे खरीप व उन्हाळी हंगामात पारंपारिक पध्दतीने उत्पादन घेतो. आमच्या गावातील शेतकरी कृषि विभागाच्या योजनांमधून पिक प्रात्यक्षिकामध्ये सहभागी होऊन नविन वाणाचा वापर करीत. तरीही शेतकऱ्यांना मिळणारे शेतीचे तांत्रिक ज्ञान एकमेकांमार्फत गावात पोहचविण्यास मर्यादा होत्या. परंतू गेली पाच वर्ष किल्ला - रोहा येथील कृषि विज्ञान केंद्रामार्फत भात शेतीची विविध पिक प्रात्यक्षिके, प्रशिक्षणे, क्षेत्र दिन कार्यक्रम, पशुआरोग्य शिबिर आमच्या गावात होऊ लागले. सामूहिक पध्दतीने भात पिकाचे एकच वाण वापरण्याबद्दल राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत एकात्मिक पिक व्यवस्थापन तंत्रज्ञान प्रसार प्रकल्पाच्या माध्यमातून शास्त्रज्ञांमार्फत जागरुकता निर्माण केल्यामुळे आम्ही शेतकरी एकत्रित झालो आणि नाबार्डच्या माध्यमातून शेतकरी मंडळाची स्थापना करण्यात आली.

सन२०११-१२ च्या उन्हाळी हंगामात गावातील ३१ शेतकऱ्यांनी ३७.५ हेक्टर क्षेत्रावर कर्जत - ७ या डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीने विकसित केलेल्या सुधारीत वाणाच्या सामुहिक प्रात्यक्षिकांमध्ये सहभाग घेतला. या एकात्मिक पिक व्यवस्थापन तंत्रज्ञान प्रकल्पांतर्गत गावातील शेतकऱ्यांना बियाणे, खते, औषध, किड व रोग नाशके व खोडकिड नियंत्रणाचे कामगंध सापळे पुरविण्यात आले. वापराविषयी वैयक्तिक भेटी, गटचर्चा, कृति प्रात्यक्षिके, प्रशिक्षणे, शेतकरी मेळावे व शेतकरी सहल यामधून माहिती देण्यात आली. या प्रात्यक्षिकांतर्गत प्रामुख्याने कृषि औजारांच्या वापराची प्रात्यक्षिके आम्हा शेतकऱ्यांच्या शेतावर घेण्यात आली. यामध्ये भात लावणी यंत्र, आंतरमशागतीसाठी कोनोवीडर, भात कापणीसाठी वैभव विळा व रीपर तसेच कंबाईन हार्वेस्टर या प्रात्यक्षिकांवर विशेष भर देण्यात आला. सर्व उपक्रमांमधून आमच्या शेतकऱ्यांच्या ज्ञानात चांगली भर पडली. रत्ना या वाणास पर्याय म्हणून आम्ही कर्जत - ७ हे वाण स्वीकारले व यामधून आम्हाला सरासरी हेक्टरी ५२ क्विं. एवढे उत्पादन मिळाले. सामूहिक पिक प्रात्यक्षिकांमुळे गावात एकोपा वाढला व शेतकऱ्यांमध्ये झालेली जागरुकता ही आम्हाला समाधान देणारी बाब आहे. याबद्दल आम्ही कृषि विज्ञान केंद्राचे आभारी आहोत.



**श्री. तुळशीराम अंबू कांबळे**
अध्यक्ष, खामजाई शेतकरी मंडळ, खांब, ता. रोहा, जि. रायगड



**श्री. बाळाराम रामजी लाडगे**
मु. पो. खांब, ता. रोहा, जि. रायगड

मी खांब गावचा रहिवासी असून स्वतःची १.५ एकर दुबार भातशेती आहे. आतापर्यंत पारंपारीक पध्दतीने भातशेती करीत होतो. कृषि विभाग व कृषि विज्ञान केंद्र, किल्ला - रोहा येथील तज्ञांच्या संपर्कात राहून सुधारीत भात वाणांची प्रात्यक्षिके घेत होतो. अधिक उत्पन्न देणारी बारीक तांदळाची जात मिळावी अशी अपेक्षा होती. आणि याचवेळी राष्ट्रीय कृषि विकास योजना - एकत्मिक पिक व्यवस्थापन तंत्रज्ञान प्रसार प्रकल्पांतर्गत कर्जत - ७ वाणाची लागवड करण्यात आली. भात रोपांची तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सुधारीत पध्दतीने लावणी केली. आंतरमशागतीसाठी कोनोविडरचा वापर केला. शिफारशीनुसार खते वापरली. माझ्या १.५ एकर शेतातून ३२ क्विं. उत्पादन घेतले. घरगुती वापराव्यतिरिक्त उत्पादनाची विक्री केली व उत्पादनास १२०० टन प्रती क्विं. एवढा दर मिळाला.



**श्री. रविंद्र अनंत मोहिते**
मु. पो. खांब, ता. रोहा, जि. रायगड

खांब गावात माझी १ एकर शेती माझा पारंपारीक व्यवसाय सांभाळून करतो. भात लागवडीकरीता आय. आर. ८, रत्ना किंवा जया हे बियाणे वापरत असे. एकरी ४० किलो एवढे बियाणे पेरणीसाठी व लावणीचे वेळी फक्त युरिया खत वापरत असे. उत्पन्न १५ क्विंटलच्या पुढे जात नसे. राष्ट्रीय कृषि विकास योजना - एकात्मिक पिक व्यवस्थापन तंत्रज्ञान प्रसार प्रकल्पांतर्गत सामूहिक पिक प्रात्याक्षिकांमध्ये सहभाग घेतला. एकरी २० कि. बियाणे वापरुन लावणीकरीता रोपे पुरतील की नाही याबद्दल साशंकता होती. मात्र कृषि विज्ञान केंद्राच्या तज्ञांशी वैयक्ति चर्चा, प्रशिक्षण यामधील माहितीमुळे आत्मविश्वास वाढवला. लागवडीच्या प्रत्येक टप्प्यातील तंत्रज्ञानाचा वापर केला. बियाण्यामध्ये ५० टक्के बचत होऊन लागवड खर्चात ४० टक्के बचत झाली. हे सर्व राष्ट्रीय कृषि विकास योजनेमुळेच घडले.

## राष्ट्रीय कृषि विकास योजना - एकात्मिक पिक व्यवस्थापन तंत्रज्ञान प्रसार प्रकल्प

# सामूहिक भात पिक प्रात्यक्षिक




**गाव – पिंगळसई, ता. रोहा**

**वर्ष – २०१२–१३**

**हंगाम – खरीप**

**पिक – भात, जात – कर्जत – ५**

**सहभागी शेतकरी – २०**



आम्ही पारंपारीक पध्दतीने भात शेती करणारे शेतकरी. खरीप हंगामात भात व रब्बीच्या हंगामात वाल, मटकी, मूग ही कडधान्ये आम्ही पिकवितो. भात पिकावर पडणारे रोग तसेच अवकाळी पाऊस तसेच शेतकऱ्यांची शेतीमधील अनास्था यामुळे भातशेती करणे लाभदायक वाटत नव्हते. सर्वात महत्वाचे म्हणजे भातशेती मध्ये एकमेकांचे सहकार्य फार कमी झाले असताना नाबार्ड अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र, रोहा मार्फत काळभैरव शेतकरी मंडळाची स्थापना करण्यात आली. आमच्या सहकार्याने शेतकरी मंडळाच्या माध्यमांतून विविध उपक्रम राबवित असताना राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत सामूहिक भात पिक प्रात्यक्षिक राबविण्याबाबतची माहिती मिळाली. कृषि विज्ञान केंद्राच्या अधिकाऱ्यांनी आमच्या गावात येवून शेतकरी बांधवांशी संपर्क साधला व सविस्तर माहिती दिली त्यामुळेच आमच्या गावांतील ३० शेतकऱ्यांनी कर्जत – ५ या भात बियाण्याची ७.५ हे. क्षेत्रावर लागवड केली.

या प्रात्यक्षिकांदरम्यान अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गादीवाफा रोपवाटिकेचा अवलंब केला आम्हांला परंपरागत राब पध्दतीने खर्च जास्त येत होता. गादीवाफा पध्दतीने खर्च कमी झाला. रोपवाटिकेतील तणनियंत्रण सहज शक्य झाले. भात रोपांची २०X१५ सेमी अंतरावर लावणी केली. आम्हाला भात पिकासाठी गादीवाफा पध्दत, खत व्यवस्थापन, किड–रोग नियंत्रण याविषयी कृति प्रात्यक्षिके व प्रशिक्षण देण्यात आले. सुधारीत बियाणे, योग्य पेरणी पध्दत व खत व्यवस्थापन यामधून मिळणारे फायदे आमच्या गावातील शेतकऱ्यांना या योजनेअंतर्गत मिळालेल्या भरघोस उत्पादनामुळे लक्षात आले आहेत. गावातील बहुतांश शेतकरी पेरणीसाठी हेक्टरी ६० ते ७० किलो बियाणे वापरत व त्यातून २५ ते ३० क्विं. एवढेच उत्पादन मिळत होते. मात्र राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत कृषि विज्ञान केंद्रामार्फत मिळालेल्या तांत्रिक ज्ञानामुळे केवळ ४० कि. प्रती हेक्टर एवढे बियाणे वापरुन सरासरी ५० क्विं. एवढे उत्पादन मिळाले.



**श्री. वसंत रामचंद्र मोहिते**
अध्यक्ष, काळभैरव शेतकरी मंडळ,
पिंगळसई, ता. रोहा, जि. रायगड



**गाव – शिरवली–मुठवली, ता. रोहा**

**वर्ष – २०१२ – १३**

**हंगाम – उन्हाळी**

**पिक – भात, जात – कर्जत – ३**

**सहभागी शेतकरी – ३५**



शिरवली – मुठवली ही गावे राष्ट्रीय महामार्ग १७ पासून १ किमी. अंतरावर आहेत. शेती पारंपारीक पध्दतीने करताना उत्पादन आणि येणारा खर्च याचा ताळमेळ कधी जुळत नसे. तरुणांची शेतीमध्ये कमी झालेला सहभाग, मजुरांची कमतरता, उत्पादनाला मिळणाऱ्या दरातील चढ उतार यामुळे शेतकऱ्यांमध्ये खूपच नाराजी होती. सन २०१२ – १३ च्या उन्हाळी हंगामात शिरवली–मुठवली गावातील शेतकऱ्यांना राष्ट्रीय कृषि विकास योजना एकात्मिक पिक व्यवस्थापन तंत्रज्ञान प्रसार प्रकल्पामध्ये सहभागी होण्याची संधी कृषि विज्ञान केंद्र, रोहामार्फत मिळाली. सामूहिक शेती ही संकल्पना सर्व शेतकऱ्यांना तज्ञांमार्फत समजावून दिली आणि शिरवलीमधील १२ व मुठवली गावातील १२ शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. प्रत्येक गावात ५ हे. क्षेत्रावर कर्जत – ३ या वाणाची लागवड करण्यात आली. एकरी ३५ ते ४० किलो बियाणे पेरणीसाठी वापरणाऱ्या शेतकऱ्यांनी एकरी २० किलो बियाणे पेरली. उगवण चांगली झाली आणि योग्य अंतर राखून लावणी करण्यात आली. आमच्या भागात होणाऱ्या खोडकिडीच्या प्रादुर्भावापासून पिक संरक्षणाकरीता एकात्मिक किड / रोग व्यवस्थापनाची माहिती शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमात देण्यात आली. खोलगट नांगरट, रोपवाटिकेत फोरेटचा वापर, लावणी क्षेत्रात कामगंध सापळ्यांचा वापर यामुळे खोडकिडीचा प्रादुर्भाव अतिशय कमी आढळला. भात लावणी ते कापणी काळात आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळाली. शेतकरी मेळाव्यामधून आम्हाला तज्ञांकडून अतिशय चांगले मार्गदर्शन लाभले. त्याचप्रमाणे आमचे विचारही मांडण्याची संधी मिळाली.

आमच्या गावातील पिक प्रात्यक्षिकांना आजूबाजूच्या गावातील शेतकऱ्यांनी भेटी दिल्या व माहिती जाणून घेतली. आम्हाला या प्रात्यक्षिकामधून सरासरी ४८.४ क्विंटल प्रति हेक्टर एवढे उत्पादन मिळाले. कृषि विज्ञान केंद्रामार्फत अशा प्रकारची सामुहिक पिक प्रात्यक्षिके आयोजित केल्यामुळे शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढला आहे.



**श्री. तुकाराम विठोबा पोटफोडे**
अध्यक्ष, बापूजी शेतकरी मंडळ,
शिरवली, ता. रोहा, जि. रायगड

# राष्ट्रीय कृषि विकास योजना - एकात्मिक पिक व्यवस्थापन तंत्रज्ञान प्रसार प्रकल्प

# सामूहिक भुईमूग पिक प्रात्यक्षिक



गाव - दिविल, ता. पोलादपूर

वर्ष - २०११ - १२

हंगाम - उन्हाळी

पिक - भुईमूग,

जात - कोकण ट्रॉम्बे टपोरा

सहभागी शेतकरी - १७



रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुका हा प्रामुख्याने डोंगराळ भाग. तालुक्यातील बहुतांश गावात खरीप हंगामात भातशेती हेच उपजिविकेचे साधन. आमचे दिविल हे गाव तालुक्यापासून ७ कि. मी. अंतरावर असून गावात भातशेती व रब्बी हंगामात कडधान्ये लागवड होते. गावाजवळून वाहणाऱ्या सावित्री नदी पात्रात वर्षभर पाणी असते. परंतु नदी किनारी उन्हाळी शेती अत्यंत कमी शेतकरी करतात. गावातील शेतकऱ्यांनी रोहा कृषि विज्ञान केंद्राच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी मंडळाची स्थापना केली. राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या तंत्रज्ञान प्रसार कार्यक्रमांतर्गत भुईमूगाची ५ हे. क्षेत्रावर सामूहिकरित्या लागवड करण्याची संकल्पना महाड शेतकरी मंडळाचे अध्यक्ष श्री. तुकाराम देशमुख आणि कृषि विज्ञान केंद्राच्या तज्ज्ञांमार्फत समजली. नदीलगतची ५ हे. जमिन भाडेतत्वावर रब्बी उन्हाळी हंगाम २०११ - १२ मध्ये घेण्यात आली. लागवडपूर्व प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये केंद्राच्या तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले. लागवडीकरीता ४ हे. क्षेत्रावर एस. बी. ११ तर १ हे. क्षेत्रावर कोकण ट्रॉम्बे टपोरा या जातीची लागवड केली.

पडिक जमिनीत भुईमूग लागवडीचा हा पहिलाच प्रयोग असल्याने खूप अडचणी आल्या. मात्र कृषि विज्ञान केंद्राच्या तज्ज्ञांनी लागवड ते काढणी पर्यंतच्या काळात वारंवार भेटी दिल्या. स्वस्तिक भरणी औजार वापराचे प्रात्यक्षिक दिले. लागवड काळात परिसरातील बहुतांश शेतकरी, कृषि विभाग अधिकारी यांनी भेट देऊन आम्हा सर्व शेतकऱ्यांच्या मेहनतीचे कौतुक केले. यामुळे आमचा आत्मविश्वास वाढला. योजनेअंतर्गत आयोजित शेतकरी सहलीमध्ये सहभाग घेतल्याने इतर भागातील प्रगतशिल शेतकऱ्यांची शेती पाहिल्यावर आपण नक्की कुठे कमी पडतो याची जाणीव झाली. एस. बी. ११ जातीपासून सरासरी १३ क्विं. तर कोकण ट्रॉम्बे टपोरा पासून सरासरी १६.५ क्विं. एवढे उत्पन्न मिळाले. भुईमूगासारखे नगदी पिक आपल्या भागात चांगल्या प्रकारे येवू शकते हे या प्रात्यक्षिकामुळे लक्षात आले.



**श्री. मधुकर राजाराम भिलारे**
अध्यक्ष, काळभैरव शेतकरी मंडळ,
दिविल, ता. पोलादपूर



गाव - नडगाव, ता. महाड

वर्ष - २०११ - १२

हंगाम - उन्हाळी

पिक - भुईमूग जात - एस.बी.११

तंत्रज्ञान - प्लास्टिक आच्छादनाचा वापर

सहभागी शेतकरी - २०



नडगाव हे मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गालगतचे महाड तालुक्यातील गाव. गावातील शेतकरी सावित्री नदीकाठी खरीप हंगामात भातशेती तर रब्बी - उन्हाळी हंगामात कडधान्ये व भाजीपाला लागवड करतात. महाड तालुक्यात भुईमूगाची शेती प्रामुख्याने वरंध, आसनपोई, वरसगांव या गावातील शेतकरी करतात. नडगाव गावातील शेतकऱ्यांना भुईमूग शेतीचा कमी अनुभव होता. परंतु सन २०११ च्या रब्बी - उन्हाळी हंगामात कृषि विज्ञान केंद्र रोहा मार्फत राष्ट्रीय कृषि विकास योजना - एकात्मिक पिक व्यवस्थापन तंत्रज्ञान प्रसार प्रकल्पांतर्गत भुईमूग लागवडीची माहिती देण्यात आली. गावात नुकतेच १५ शेतकऱ्यांनी केंद्राच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली नाबार्ड अंतर्गत शेतकरी मंडळांची स्थापना केली आहे. राष्ट्रीय महामार्गालगतच्या ५ एकर जमिनीमध्ये भुईमूग लागवडकरण्याचे निश्चित करण्यात आले.

कृषि विज्ञान कंद्र, रोहामार्फत लागवडपूर्व प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये बियाणे निवड, बिजप्रक्रिया लागवड पध्दत, खत व पाणी व्यवस्थापनाची माहिती मिळाली. ५ एकर पैकी ४ एकर क्षेत्रावर गादीवाफे पध्दतीने भुईमूग लागवड केली तर १ एकर क्षेत्रावर प्लास्टिक आच्छादनाचा वापर करुन लागवड करण्यात आली. लागवडीकरीता एस. बी. ११ या जातीचे बियाणे वापरण्यात आले. प्लास्टिक आच्छादन वापरल्यामुळे बियाण्याची उगवण ६ दिवस अगोदर झाली, गवताचे प्रमाण कमी झाले आणि पाण्याची बचत होऊन आंतरमशागतीचा खर्च कमी झाला. दोन्ही पध्दतीतील लागवडीमधून पीक मशागत, तण व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन व आंतरमशागत यातील फरक दिसून आला. कृषि विज्ञान केंद्राच्या अधिकाऱ्यांनी वेळोवेळी भेटी देवून मार्गदर्शन केले. आंतरमशागतीसाठी विद्यापीठाने विकसित केलेल्या स्वस्तिक भरणी औजाराचा वापर केल्याने मजुरी खर्चात बचत झाली. या सामूहिक पिक प्रात्यक्षिकांतर्गत आम्हाला गादीवाफा पध्दतीने हेक्टरी १२ क्विं. तर प्लास्टिक आच्छादन लागवडीतून १९.५ क्विं. एवढे उत्पन्न मिळाले. पुढील दोन वर्षात आम्ही सातत्याने भुईमूग पिक घेत आहोत याचे सर्व श्रेय राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या सामूहिक पिक प्रात्यक्षिकांमध्ये मिळालेल्या आत्मविश्वासाचेच.



**श्री. संतोष सुंदर गायकवाड**
अध्यक्ष, अमर शेतकरी विकास मंडळ
नडगाव, ता. महाड

# राष्ट्रीय कृषि विकास योजना - एकात्मिक पिक व्यवस्थापन तंत्रज्ञान प्रसार प्रकल्प

# सामूहिक भुईमूग पिक प्रात्यक्षिक



गाव - पडवी, ता. महाड

वर्ष - २०१२ - १३

हंगाम - खरीप

पिक - भुईमूग,

जात - कोकण ट्रॉम्बे टपोरा

सहभागी शेतकरी - १६



महाड तालुक्यातील पडवी हे गाव शहरापासून १८ किमी अंतरावर आहे. शेतीमध्ये भात हे प्रमुख पिक खरीप हंगामात घेतले जाते भाताच्या सुवर्णा, जया, रत्ना ह्या प्रचलित जातींची लागवड करण्यात येते. सन २०१२ मध्ये शेतकरी विकास संस्थेचे अध्यक्ष व रोहा कृषि विज्ञान केंद्राच्या शास्त्रीय सल्लागार समितीचे सदस्य श्री. तुकाराम देशमुख यांच्याशी संपर्क झाला व त्यांच्यामार्फत कृषि विज्ञान केंद्र, किल्ला येथील तज्ज्ञांशी सुधारीत शेतीविषयी चर्चा केली. रायगड जिल्ह्यात फक्त रब्बी – उन्हाळी हंगामात भुईमूग पिक घेतले जाते. राष्ट्रीय कृषि विकास योजना – एकात्मिक पिक व्यवस्थापन तंत्रज्ञान प्रसार कार्यक्रमांतर्गत खरीप हंगामात भुईमूग लागवडीचे प्रात्यक्षिक पडवी गावात आयोजित करण्याबाबत कृषि विज्ञान केंद्रामार्फत माहिती मिळाली. केंद्राच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली सुरु झालेले काळभैरव शेतकरी मंडळाच्या १६ सदस्यांनी यात सहभाग घेण्याचे ठरविले. जून २०१२ च्या शेवटच्या आठवड्यात विद्यापीठ विकसित कोकण ट्रॉम्बे टपोरा या जातीची लागवड ५ हेक्टर क्षेत्रावरील वरकस जमिनीत केली. तसेच एस. बी. ११ या प्रचलित बियाण्याची लागवडही १ हेक्टर क्षेत्रावर केली. प्रात्यक्षिकांदरम्यान बिजप्रक्रिया, पेरणी, आंतरमशागत, अतिरिक्त पाण्याचा निचरा, तंत्रनियंत्रण याविषयी कृषि विज्ञान केंद्राच्या तज्ज्ञांनी प्रत्यक्ष भेटी, प्रशिक्षण, प्रात्यक्षिक याद्वारे माहिती दिली. सामूहिक शेती असल्याने १६ सदस्यांनी आपापल्या क्षमतेनुसार कामाची विभागणी केली. पिक फुलोरा ते काढणीपर्यंत जंगली जनावरांपासून संरक्षणावर अधिक भर देण्यात आला.

आमच्या गावात शेतकरी मेळाव्याचे व शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठ शास्त्रज्ञ, कृषि विभाग अधिकारी व पडवी परिसरातील १० गावातील २५० शेतकऱ्यांनी पिक पाहणी केली. शेतकऱ्यांच्या मेहनतीचे उत्तम फळ मिळाले. कोकण ट्रॉम्बे टपोरा जातीचे सरासरी हेक्टरी १८.५ क्विं. तर एस. बी. ११ जातीचे १२.५ क्विं. एवढे उत्पन्न मिळाले. खरीप हंगामातही उत्तम भुईमूग पिक घेता येते. हे केवळ राष्ट्रीय कृषि विकास योजना – एकात्मिक पिक व्यवस्थापन तंत्रज्ञान प्रसार कार्यक्रमांतर्गत कृषि विज्ञान केंद्र, रोहा यांनी दिलेल्या तांत्रिक ज्ञानामुळेच असे आम्हाला नमूद करावेसे वाटते.



**श्री. अनंत महिपत साळुंखे**
अध्यक्ष, काळभैरव शेतकरी मंडळ,
पडवी, ता. महाड



**श्री. सिताराम कृष्णा साळुंखे**
मु. पडवी, ता. महाड

खरीप हंगामात भुईमूग लागवड करणेबाबत कृषि विज्ञान केंद्रामार्फत मार्गदर्शन झाले तेव्हा मनात खूप शंका निर्माण झाल्या. आमच्या भागातील मुसळधार पाऊस, पडीक वरकस जमिन, जंगली जनावरांचा त्रास यामधून पिक घेणे केवळ अशक्यप्राय वाटत होते. मात्र कृषि विज्ञान केंद्राच्या तज्ज्ञांनी प्रत्यक्ष गावात भेट दिली. लागवड क्षेत्रात मशागत, पाणी व्यवस्थापन, कुंपण व्यवस्था याची विशेष खबरदारीबाबत माहिती देऊन बियाणे व खतांचा पुरवठा केला. राष्ट्रीय कृषि विकास योजनेमधून खरीप भुईमूग लागवडीचा प्रयोग सफल झाल्याचे मला माझ्या १ एकर जमिनीतून मिळालेल्या ७.५ क्विं. उत्पन्नावरुन दिसून आले. आम्हाला पिक प्रात्यक्षिक कार्यक्रमात सहभागी करुन घेतल्याबद्दल आम्ही कृषि विज्ञान केंद्राचे आभारी आहोत.



**श्री. विजय बबन साळुंखे**
मु. पडवी, ता. महाड

राष्ट्रीय कृषि विकास योजना तंत्रज्ञान प्रसार कार्यक्रमामधून खरीप हंगामातील रायगड जिल्ह्यातील भुईमूग लागवडीचा प्रयोग यशस्वी झाला तो केवळ कृषि विज्ञान केंद्र, किल्ला – रोहाचे सर्व तज्ञ व शेतकरी विकास संस्था, महाडचे पदाधिकारी यांनी दिलेल्या प्रेरणेमुळे. सामुहिक शेती ही संकल्पना भात पिकामध्ये मर्यादित स्वरुपात होती. परंतु या सामूहिक पिक प्रात्याक्षिकांमुळे आमच्या गटाचा आत्मविश्वास वाढला. क्रयशक्ती जागृत झाली. खरीप भुईमूग लागवडीच्या यशस्वी प्रयोगामुळे आमचे पडवी हे गाव जिल्ह्यात नावारुपास आले याचा आम्हाला विशेष आनंद आहे. आम्ही विद्यापीठाचे व कृषि विज्ञान केंद्राचे अत्यंत आभारी आहोत.

राष्ट्रीय कृषि विकास योजना - कृषि विद्यापीठ विकसित बियाण्यांचा

# ग्रामबिजोत्पादन कार्यक्रम




गाव - वरंध, ता. महाड

वर्ष २०११ - २०१२

हंगाम - उन्हाळी

पिक - भुईमूग

जात - कोकण ट्रॉम्बे टपोरा

सहभागी शेतकरी - ५









वरंध हे रायगड जिल्ह्यातील महाड पुणे मार्गावरील एक आदर्श गाव. महाडपासून गावाचे अंतर १७ किमी इतके आहे. गावात पूर्वीपासून पारंपारीक पध्दतीने खरीप हंगामात भात लागवड तर रब्बी हंगामात वाल, पावटा, मूग, मटकी इ. कडधान्ये घेतली जात होती. गावात महाराष्ट्र प्रशासनाच्या पाटबंधारे विभागामार्फत धरण बांधण्यात आले. तेव्हापासून गावातील शेतकऱ्यांनी रब्बी-उन्हाळी हंगामात भुईमूग पिक घेणे सुरु केले. शेतकरी लागवडीकरीता मिळेल त्या जातीचे बियाणे घेत असत. एस. बी. ११, वेस्टर्न - ४४, टी. जी. - २६ या जातींचा वापर होत होता. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली विकसित कोकण ट्रॉम्बे टपोरा या जातीची लागवड व बिजोत्पादन कार्यक्रम वरंध गावात घेण्याविषयी कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. मनोज तलाठी व विस्तारतज्ञ डॉ. प्रा. प्रमोद मांडवकर यांचेमार्फत मार्गदर्शन मिळाले. आम्ही ५ शेतकऱ्यांनी एकत्र येवून या बिजोत्पादन कार्यक्रमामध्ये सहभागी व्हायचा निश्चय केला.

आम्ही शेतकरी पारंपारीक लागवडीमध्ये नांगरणी करुन बियाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता बियाण्याची पेरणी करतो. यामुळे रोगाचा प्रादुर्भाव होऊन उगवण कमी व्हायची व एकूणच उत्पादन कमी येत होते. राष्ट्रीय कृषि विकास योजना ग्राम बिजोत्पादन कार्यक्रमांतर्गत कोकण ट्रॉम्बे टपोरा जातीचे उत्तम बियाणे मिळाले. गावात घेण्यात आलेल्या बिजोत्पादन प्रशिक्षण कार्यक्रमामधून शास्त्रोक्त माहिती मिळाली. प्रशिक्षणामध्ये मिळालेल्या माहितीनुसार मर रोगाचा प्रादुर्भाव कमी झाल्याचा आढळून आले. व बियाण्याची उगवण ९५ टक्केपर्यंत आढळून आली. लागवड ते काढणी पर्यंतच्या काळात विद्यापीठाच्या बिजोत्पादन कार्यक्रमाचे अधिकारी व कृषि विज्ञान केंद्राच्या तज्ञांनी वारंवार भेटी देवून मार्गदर्शन केले. आंतरमशागतीकरीता विद्यापीठाने विकसित केलेल्या स्वस्तिक भरणी औजार वापराचे प्रात्यक्षिक दिले. या अवजाराचा प्रत्यक्ष वापर केल्याने मजूर खर्चात ५० टक्केपर्यंत बचत झाली. पिकावर किडी व रोगांचा अल्प प्रादुर्भाव दिसून आला परंतु वेळीच उपाययोजना केल्याने नुकसान झाले नाही. यापूर्वी हेक्टरी १० ते १२ क्विं. एवढेच उत्पादन मिळत होते. मात्र कोकण ट्राम्बे टपोरा जातीपासून १७.५ क्विं. एवढे उत्पादन मिळाले. ग्राम बिजोत्पादन कार्यक्रमांतर्गत तयार बियाणे कृषि विज्ञान केंद्राने खरेदी केल्याने ५० टक्के अधिक दर मिळाला.लागवड काळात परिसरातील बहुतांश शेतकरी, कृषि विभाग अधिकारी यांनी भेट देऊन आम्हा सर्व शेतकऱ्यांच्या मेहनतीचे कौतुक केले. यामुळे आमचा आत्मविश्वास वाढला.

बिजोत्पादन कार्यक्रमातील सुधारीत पध्दतीने केलेल्या भुईमूग लागवडीमुळे आमचा चांगला आर्थिक फायदा झाला. त्यानंतर पुढील उन्हाळी हंगामातदेखील आम्ही कोकण ट्रॉम्बे टपोरा या भुईमूगाच्या जातीची लागवड केली व इतर शेतकऱ्यांना देखील बियाणे पुरविले. राष्ट्रीय कृषि विकास योजनाच्या ग्राम बिजोत्पादन कार्यक्रमात आम्हाला सहभागी करुन घेतल्याबद्दल आम्ही डॉ. बाळासाहेब सावंत कृषि विद्यापीठाचे व रोहा कृषि विज्ञान केंद्राचे आभारी आहोत.



**श्री. राजेंद्र विठ्ठल देशमुख**
बिजोत्पादन शेतकरी गट प्रमुख, वरंध

## राष्ट्रीय कृषि विकास योजना - एकात्मिक पिक व्यवस्थापन तंत्रज्ञान प्रसार प्रकल्प

# मनुष्यबळ विकास कार्यक्रमाअंतर्गत कृषि विस्तार उपक्रम




## मार्गदर्शक

**डॉ. प्रमोद सावंत**
विभाग प्रमुख (कृषि विस्तार) व
प्रकल्प प्रमुख , राष्ट्रीय कृषि विकास योजना
एकात्मिक पिक व्यवस्थापन तंत्रज्ञान प्रसार प्रकल्प

**डॉ. हणमंत पाटील**
विस्तार शिक्षण संचालक
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली, जि. रत्नागिरी

## सहभागी शास्त्रज्ञ

**डॉ. मनोज तलाठी**

**डॉ. प्रमोद मांडवकर** **प्रा. जीवन आरेकर** **प्रा. सुधाकर पाध्ये**

**प्रा. माधव गित्ते** **डॉ. आनंद हणमंते** **डॉ. राजेश मांजरेकर**

## सहभागी विस्तार कार्यकर्ते

**श्री. रत्नाकर झगडे** **श्री. सुहास माने** **श्री. किरण इदाते**

---

**संकलक व सहसंपादक**
**डॉ. प्रमोद मांडवकर**
विषय विशेषज्ञ (कृषि विस्तार)
कृषि विज्ञान केंद्र, किल्ला – रोहा

**संपादक**
**डॉ. मनोज तलाठी**
कार्यक्रम समन्वयक
कृषि विज्ञान केंद्र, किल्ला – रोहा

मुद्रण, रोहा : ९४२२४९४४४०